CREDAI-MCHI

# प्रकल्पांसाठी भोगवटा प्रमाणपत्र देण्यासाठी विविध एजन्सींची नियुक्ती करण्याची महारेराची सूचना

*प्रकल्पांच्या भोगवटा प्रमाणपत्रांच्या कामाची एकाधिकारशाही टाळण्यासाठीचे पाऊल*

*विकासकांनी भोगवटा प्रमाणपत्रासाठी वेळेत अर्ज करूनही ७०० हून अधिक प्रकल्पांना भोगवटा प्रमाणपत्र मिळण्यास झाला विलंब*

नवी दिल्ली येथे १३ व १४ फेब्रुवारी २०१९ रोजी आयोजित करण्यात आलेल्या क्रेडाइच्या 'युथकॉन-१९' या परिषदेमध्ये महारेराचे अध्यक्ष श्री. गौतम चॅटर्जी म्हणाले की, सध्या एकाच अधिकाऱ्याकडे भोगवटा प्रमाणपत्र (ओसी) देण्याची जबाबदारी असल्याने त्याच्याकडेच एकाधिकारशाही आहे. ती मोडण्यासाठी ओसी देण्यासाठी अनेक एजन्सींची नियुक्ती करण्यात यावी. एकट्या महाराष्ट्रातच ७०० असे प्रकल्प आहेत ज्यांच्या विकासकांनी ओसी मिळविण्यासाठी वेळेत अर्ज केला होता. परंतु, एकाच व्यक्तीच्या हाती हा अधिकार असल्याने ही प्रक्रिया रखडली आहे. प्रकल्पासाठीच्यी मंजुऱ्या देण्याचा अधिकार त्याच नियोजन प्राधिकरणाकडे असतो. असे असूनही कमेन्समेंट सर्टिफिकेटनुसार बांधण्यात आलेलल्या प्रकल्पासाठी ओसी देण्यास त्याच प्राधिकरणाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या अधिकाऱ्याला इतका वेळ का लागावा, असा सवाल चॅटर्जी यांनी विचारला आहे. प्लॅनर्स आणि वास्तुरचनाकारांचे पॅनल असलेल्या विविध एजन्सींकडे तपासणी करण्याची व भोगवटा प्रमाणपत्र प्रदान करण्याची प्रक्रिया सोपविण्याची यंत्रणा तयार करण्याची सूचन त्यांनी केली, जेणेकरून एका अधिकाऱ्याच्या उदासीन वृत्तीमुळे कोणत्याही कारणाशिवाय ओसी देण्यास विलंब करण्याच्या एका अधिकाऱ्याकडे असलेली एकाधिकारशाही मोडता येईल.

महाराष्ट्र रेरा प्रमुख गौतम चॅटर्जी यांनी उत्तरप्रदेश येथील रेरा प्रमुख राजीव कुमार, मध्यप्रदेशचे रेरा प्रमुख श्री. अँथनी डे सा आणि हरियाणा रेरा प्रमुख श्री. के. के. खंडेलवाल यांच्यासमवेत उपस्थितांना रेराविषयी माहिती दिली.

मंजुरी प्राधिकरण रेराच्या कक्षेत येण्याची वाट विकासक पाहत आहेत, असा प्रश्न क्रेडाइ एमसीएचआयचे अध्यक्ष श्री. नयन शहा यांनी विचारल्यानंतर महारेराच्या अध्यक्षांनी आपले मत व्यक्त केले.